सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

कृषि विभाग

# कृषि तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा)

# यशोगाथा

## सेंद्रिय शेती

शेतक-याचे नांव - श्री. संजय जगन्नाथ घोडमारे

रा. पो. - शेगांव (बु.), ता. - वरोरा, जि. - चंद्रपूर



-: कार्यालय :-

तालुका कृषि अधिकारी

वरोरा

# यशोगाथा

## पंरपरागत कृषि विकास योजना (सेंद्रिय शेती) अंतर्गत

### “तंत्रज्ञान आधारीतएकात्मिक शेती पध्दती”



**श्री.संजय जगन्नाथघोडमारे**
**रा.व पोष्ट - शेगांव (बु.),**
**ता. वरोरा, जि.चंद्रपूर**
**दुरध्वनीक्र. - ९६७३६७३८३७**
**शिक्षण - पदवी (बि.एससी.)**

वरोरा तालुका म्हटल तर तसा भौगोलिक दृष्ट्या सधनच म्हणावा लागेल. बहु पिक पध्दती, उद्योगधंदे व इतर सोई सुविधा असलेला. शेगांव बु. हे तालुक्यापासून २० किमी अंतरावर व जिल्ह्याचे ठिकाणाहून उत्तरेस ६५ किमी अंतरावरील ग्रामपंचायतीचे गांव. लोकसंख्या व क्षेत्रफळाचे दृष्ठीने गांव मोठे,



व्यापारी दृष्ट्या देखिल महत्वाचे, मोठ मोठे राईस मिल व इतर उद्योग पण शेतक-यांचा शेतीकल फक्त शेतीकडेच. ब-याचशा शेती पूरक उद्योगांना वाव असतांना सुध्दा एकटा शेतकरी म्हणा किंवा शेतकरी गट शेती पूरक व्यवसाय/उद्योग करावयास फारसा धजावत नव्हता. अशा स्थितीत मध्यम परिस्थिती थोडी थोडकी शेती असलेल्या गावातीलच श्री.संजय जगन्नाथ घोडमारे या शेतक-याने शेती व्यवसायात नवीन करण्याचे ठरविले.



श्री.संजय जगन्नाथ घोडमारे हे शेगांव (बु.), पो. शेगांव (बु.), ता.वरोरा, जि.चंद्रपूर येथील प्रगतशिल शेतकरी असुन त्यांचेकडे स्वतःची २.५ एकर शेती आहे. सर्वसाधारण परिस्थितीत त्यांनी त्यांचे पदवी पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर नोकरी करण्याचा निर्णय घेतला. पण मनायोग्य नोकरी मिळत नसल्याने ते निराश झाले व त्यांनी शेती करण्याचा मार्ग निवडला. व ते शेती व्यवसाय करुन त्यामध्ये आवश्यक बदल घडवून अधिक उत्पादन घेणारे शेतकरी म्हणून ते परिसरात सूपरिचित आहेत. स्वतः

कडील २.५ एकर व काही मक्त्याची शेती अशी १० एकर शेतीवर ते सोयाबीन, कापूस, धान, तूर, कांदा, मिरची, काकडी, हरभरा, गहू व इतर भाजिपाला या सारख्या पिकाचीते लागवड करतात.

महाराष्ट्र शासन - कृषि विभागाच्या कृषि तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) अंतर्गत सन २०१६-१७ पासुन राबविण्यात येत असलेल्या राष्ट्रीय शाश्वत शेती अभियानांतर्गत परंपरागत कृषि विकास योजना (सेंद्रिय शेती) या योजनेमध्ये सहभागी होवून दिनांक १५ सप्टेंबर २०१६ रोजी शेगांव (बु.) येथे सेंद्रिय शेती प्रशिक्षणामध्ये सक्रिय राहून प्रात्यक्षिकांव्दारे निविष्ठा निर्मिती बाबत जाणून घेतले. सेंद्रिय शेतीच्या





माध्यमातुन मागील ३ वर्षापासून त्यांनी सेंद्रिय शेतीचा अवलंब करुन खर्चात कमालीची बचत केलेली आहे. या सोबतच त्यांनी कुक्कुटपालन, शेळीपालन, दुग्धव्यवसाय, भाजिपाला विक्री करण्यावर त्यांनी भर दिला. शेतीमध्ये आवड असल्यामुळे तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक यांचे संपर्कात राहून कृषि विभाग व आत्मा





योजने अंतर्गत विविध तंत्रज्ञानचा शेतीत वापर करण्यास सूरुवात झाली. त्यामुळे प्रगत शेतक-यांशी व कृषि अधिका-यांसोबत संपर्क वाढला त्यातून शेती विषयी नव-नविन तंत्रज्ञानाची माहिती मिळण्यास सुरुवात झाली.

शेती करित असतांना अधिक उत्पादनाच्या हव्यासापोटी महागडी खते, औषधे, टॉनिक, वरखते असे अनेक प्रयोगत्यांनी शेतीत केले. यातून चांगले उत्पादन सुध्दा मिळत होते. परंतू नफा तोट्याची गणितीय आकडेमोड करतांना असे लक्षात आले कि, निव्वळ नफा हा फारच कमी उरायचा. आणि शेवटी कमालीची निराशा यायची. यावर उपाय शोधन्याचा प्रयत्न केला आणि

सेंद्रिय पध्दतीने शेती करण्याचे ठरविले. वरील सर्व पिके संद्रिय पध्दतीने घेण्याचे दृष्टीने किड रोग नियंत्रणासाठी दशपर्णी अर्क, लमित अर्क, जिवामृत, बिजामृत, निंबोळी तेल, अर्क या सारख्या निविष्ठांचा वापर वाढविला. त्यातुन खत व औषधावरील खर्चात बचत झाली. उत्तम प्रतिचा शेतमाल विक्रीकरिता उपलब्ध होण्यास सुरुवात झाली. सुेद्रिय पध्दतीचा अवलंब केल्यामुळे मोठ्या प्रमाणात खर्चात बचत होवून आर्थिक नफा मिळाला. व भाजिपाला व इतर शेतमालास मागणी वाढली. सोबतच वर्षभर भाजिपाला घेता यावा याकरिता एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान अंतर्गत शेडनेट उभारणी केली. व काकडी, मिरची या सारख्या भाजिपला पिकाची ऑफसिजन लागवड करुन वर्षभर भाजिपाला उत्पादनावर भर दिला आणि त्या मधून नियमित मिळकत सुरु झाली.



आत्मा योजने अंतर्गत जिल्हास्तरीय व राज्यस्तरीय प्रशिक्षण सहल मध्ये भाग घेतल्यामुळे शेतीला पुरक व्यवसाय असणे गरजेचे आहे असे निदर्शनास आले, त्यामुळे शेतीला पुरक व्यवसाय म्हणून शेतावर प्रथमता कुक्कुटपालन सुरु केले.







पहिल्या वर्षी खर्च वजा जाता १,२४,०००/- वार्षिक उत्पन्न झाले. व्यवसायातील बारकावे लक्षात येत सद्यस्थितीत ते २,५०,०००/- पर्यंत उत्पन्न मिळवत आहे. शेतीमध्ये शेतमालासोबतच मोठ्या प्रमाणात चारा उपलब्ध होवू लागला. त्यामध्ये तणीस, सोयाबीन कुटास, हरभरा कुटास, तूर कुटास, कडबा, अनावश्यक भाजिपला उपलब्ध होवू लागला. त्यातून दिशा मिळाली व शेळीपालन आणि दुग्धव्यवसायास सुरुवात केली. परंतू शेळीपालन व दुग्धव्यवसायाचा फारसा अनुभव नसल्याने व व्यवसाय वाढल्यामुळे चा-याची कमतरता जाणवू लागली. त्यातूनच चारा पिकाची लागवड करण्यास सुरुवात केली. व चा-याचा कायमचा प्रश्न निकाली निघाला. स्वतः जवळील चारा उपलब्ध झाल्याने शेळीपालनामधून रु.३,६५,०००/- व दुग्ध व्यवसायातून रु.८०,०००/- वार्षिक उत्पन्न मिळावयास सुरुवात झाली.

**मागील पाच वर्षात कोणत्या स्त्रोतातून किती उत्पन्न मिळाले याबाबत तपशिल**

| **अ.क्र.** | **पिक** | **वर्ष** | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | **२०१३-१४** | **२०१४-१५** | **२०१५-१६** | **२०१६-१७** | **२०१७-१८** |
| १ | सोयाबीन | २२४००० | २२५००० | २३०००० | २४०००० | २३८००० |
| २ | कापूस | ४२८००० | ४५०००० | ४१५००० | ३५०००० | ३१५००० |
| ३ | कांदा | ४००० | २०००० | २२००० | ३८००० | ३५००० |
| ४ | धान | ८०००० | ८५००० | ६०००० | ८०००० | ७०५०० |
| ५ | हरभरा/ गहू | १४०००० | १३५००० | ११५००० | १२५००० | १२०००० |
| ६ | भाजिपाला | ४०००० | ४५००० | ६५००० | १२०००० | १२५००० |
| ७ | तूर | २५००० | २८००० | ५०००० | ४०००० | ४५००० |
| ८ | कुक्कुटपालन | ० | ० | १२०००० | १४५००० | १५०००० |
| ९ | शेळीपालन | ० | ० | १४५००० | २५०००० | ३६५००० |
| १० | दुग्धोत्पादन | ० | ० | ७५००० | ८०००० | ८०००० |
| | **एकूण** | **९४१०००** | **९८८०००** | **१२९७०००** | **१४६८०००** | **१५४३५००** |

उपलब्ध सिंचन सुविधांचा पुरेपूर वापर करुन खरीप हंगामात कापूस, सोयाबीन, तूर, धान व रब्बी हंगामात कांदा, गहू, मिरची, काकडी, हरभरा व इतर भाजिपला तसेच उन्हाळी हंगामामध्ये शेडनेट

मधील व इतर भाजिपाला उत्पादन घेतले जाते. वरील सर्व पिके सेंद्रिय पध्दतीचा अवलंब करुन घेतल्यामुळे शेतमालास चांगली मागणी व दर सुध्दा मिळत आहे. कृषी विद्यापिठ व शासनाच्या कृषी विभागातर्फे आयोजित कृषी मेळावे, प्रशिक्षणास हजर राहून तसेच इतर प्रगतशिल शेतक-यांकडून शेतीतील अद्ययावत तंत्रज्ञान आत्मसात करुन शेतीमधून जास्तीत जास्त आर्थिक नफा मिळविण्यावर भर असतो.

इतर शेतक-यांनी सुध्दा तंत्रज्ञान आधारित एकात्मिक शेती पध्दती व सेंद्रिय पध्दतीचा स्विकार करावा व खर्चात बचत करुन शाश्वत उत्पन्न मिळवावे, हीच अपेक्षा !

---------------।। ---------------